# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 19.09.2024** **वार – गुरुवार**

---

**<u>निर्मला सितारामन</u>**

सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योगांचं मूल्यमापन त्यांच्याकडे येणाऱ्या निधीवरुन करण्यात यावं, असं प्रतिपादन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी आज पुण्यात केलं. बँक ऑफ महाराष्ट्रच्या नव्वदाव्या स्थापनादिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

**<u>मनसुख मांडविय</u>**

विकसित भारतासाठी देशातील युवा पिढीनं सामूहिक योगदान द्यावं असं आवाहन केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी आज पुण्यात केलं. युवा कनेक्ट - विकसित भारत; या कार्यक्रमादरम्यान मांडविया यांनी महाविद्यालयीन युवकांशी संवाद साधला. केंद्रीय क्रीडाराज्य मंत्री रक्षा खडसे यावेळी उपस्थित होत्या. लोकशाही बळकट करण्यासाठी युवा पिढीचं योगदान आवश्यक आहे असंही मांडवीया म्हणाले. देशाच्या विकासासाठी तरुणांनी अभिमान वाटेल अशी कामगिरी करावी अशी अपेक्षा रक्षा खडसे व्यक्त केली. स. प महाविद्यालयात झालेल्या या कार्यक्रमात महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**<u>स्वच्छता</u>**

महात्मा गांधीजींच्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी 17 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर या कालावधीत राज्यात 'स्वच्छता ही सेवा पंधरवडा' राबवण्यात येत आहे. स्वभाव स्वच्छता-संस्कार स्वच्छता; ही या अभियानाची संकल्पना आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या पुढाकाराने राबवण्यात येणाऱ्या या अभियानात शहरातील नागरिकांना आरोग्याच्या स्वच्छतेबरोबरच परिसराची स्वच्छता राखण्याविषयी मार्गदर्शन करण्यात येत आहे. तसंच महापालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालयांत याविषयी शिबिरं, तज्ज्ञांची व्याख्यानं आयोजित करण्यात येत आहेत.

**<u>ससून</u>**

पुण्यातील ससून सर्वोपचार रुग्णालयाच्या आरोग्य विषयक तपासणी प्रयोगशाळेला राष्ट्रीय प्रयोगशाळा मान्यता मंडळाचं अर्थात एन. ए. बी. एल प्रमाणपत्र प्राप्त झालं आहे. हे प्रमाणपत्र मिळवणारी ससूनची प्रयोगशाळा ही राज्यातली पहिली शासकीय रुग्णालयातील प्रयोगशाळा ठरली आहे.

**<u>भिडेवाडा</u>**

महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी पुण्यात भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली; त्या ठिकाणी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचं राष्ट्रीय स्मारक उभारण्यात येणार आहे. या स्मारकांच्या कामाला नुकतीच सुरुवात करण्यात आली आहे. या प्रस्तावित भव्य स्मारकासाठी आठ कोटी 60 लाख रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली आहे.

**<u>गणेशोत्सव</u>**

यंदाच्या गणेशोत्सवात पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने विविध विसर्जन घाटांवर तसंच मूर्ती संकलन केंद्रांवर सुमारे 250 मेट्रिक टन निर्माल्य संकलित करण्यात आलं असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी दिली. यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याबाबत पिंपरी चिंचवड महापालिकेनं नागरिकांना आवाहन केलं होतं; याला नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>साखर आयुक्तालय</u>**

गुळाचे दर घसरल्यानंतर सर्व गूळ-खांडसरी उत्पादकांच्या गटाला इथेनॉल उत्पादन घेण्यासाठी परवानगी मिळावी, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजु शेट्टी यांनी केली आहे. शेट्टी यांनी या संदर्भात साखर आयुक्त डॉक्टर कुणाल खेमनार यांची भेट घेऊन स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि गूळ-खांडसरी उद्योगाच्या प्रतिनिधींच्या वतीनं मागण्यांचं निवेदन दिलं.

**<u>कोरफड</u>**

पुण्यातील कात्रज इथल्या सरहद महाविद्यालयातील दीड हजार विद्यार्थिनी एकाच दिवशी 10 हजार कोरफड रोपांची लागवड करून विक्रम करणार आहेत. महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने कोरफड अतिशय महत्त्वाची वनस्पती आहे. जागतिक पर्यावरण आरोग्य दिनाचं औचित्य साधून येत्या शनिवारी हा उपक्रम राबवला जाईल अशी माहिती सरहद महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. संगीता शिंदे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

**<u>विद्यापीठ</u>**

राज्यभरातील उच्चशिक्षण संस्था आणि वसतीगृहांमधील विद्यार्थिनींमध्ये शिक्षणाबरोबरच महिला सुरक्षिततेविषयक कायद्यांबाबत जनजागृती करण्यासाठी राज्याच्या उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाने राज्यभरात ‘महिला सुरक्षितता आणि शिष्यवृत्ती विषयक कार्यशाळेचं’ आयोजन केलं आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये या संदर्भात उद्या विभागीय मुख्य कार्यशाळा होणार आहे. उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत याचं उद्घाटन होणार आहे.

**प्रवक्ता**

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या प्रदेश प्रवक्तेपदी आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष महेश शिंदे यांची निवड झाली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष, खासदार सुनील तटकरे यांनी शिंदे यांच्या निवडीचे पत्र दिले.

**शिरोळे**

सेवानिवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी कायम प्रयत्नशील राहण्याचं आश्वासन आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी आज दिले. महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त पोलीस कल्याणकारी शिखर संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये ते बोलत होते. पोलीस प्रशासन, वर्तमान पोलीस कर्मचारी आणि सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी यांमध्ये समन्वय साधण्यासाठी समन्वय सत्राचं आयोजन करावं अशी सूचना यावेळी शिरोळे यांनी केली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश अंशतः ढगाळ होतं. कमाल तापमान 32 तर किमान तापमान 20 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही असंच हवामान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**